# मेट्रो ३ च्या २४८ डब्यांची भारतात होणार निर्मिती

▪ मुंबई

एमएमआरसीने गुरुवारी मेट्रो ३ चे डब्बे बनविण्याचे कंत्राट निविदा प्रक्रियेनुसार ऑल्स्टोम ट्रान्सपोर्ट इंडिया लि. आणि ऑल्स्टोम ट्रान्सपोर्ट एस.ए.फ्रांस संयुक्त यांना दिले. मुंबईकरांना कुलाबा-वांद्रे-sipz मेट्रो ३ सेवेसाठी मेट्रो गाड्यांच्या निर्मितीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. यानुसार पूर्वापात्र झालेल्या कंत्राटदारांमधून ऑल्स्टोम ट्रान्सपोर्ट इंडिया लि. आणि ऑल्स्टोम ट्रान्सपोर्ट एस.ए.फ्रांस संयुक्त ची निवड करण्यात आली आहे. खरेदी प्रक्रियेची कायदेशीर नियम-अटींची योग्य प्रकारे पूर्तता करून जायका ची मान्यता मिळाल्यानंतर हे कंत्राट देण्यात येणार आले.

डिझाईन , निर्मिती, पुरवठा, मांडणी , चाचणी आणि प्रकल्पाची प्रत्यक्ष सुरुवात या कामांचा कंत्राटात समावेश असून ८ डब्यांची ३१ ट्रेन अशी रचना आहे. १८० लांबी असलेल्या डब्यांची क्षमता ३०० प्रवासी प्रति डब्बा आणि पूर्ण ट्रेनची एकूण क्षमता २३५० प्रवाश्यांची आहे. आसनव्यवस्था ही या डब्यांची खासियत आहे. ट्रेन २५ केव्ही एसी ट्रॅक्शन विद्युत पुरवठ्यावर कार्यरत होणार आहे. प्रत्येक बाजूला ४ दरवाजे अशी व्यवस्था असून डब्बे स्टेनलेस स्टील धातूचे आहेत. कंत्राट निश्चितीच्या निमित्ताने बोलताना एमएमआरसीच्या प्रवक्ते म्हणाले प्रकल्पाच्या दृष्टीने हा एक महत्वाचा टप्पा आहे. अधिकाधिक प्रवासी आणि त्यानुसार ट्रेनची संख्या हे आव्हान आहे. त्यासाठी उत्तम दर्जाचे आणि प्रवाशांच्या दृष्टीने सुरक्षित डब्बे ही महत्वाची बाब आहे. त्यासाठी कम्युनिकेशन आधारित ट्रेन नियंत्रण प्रणाली आणि विना चालक ट्रेन पद्धती ही योजना आहे.